धुळे - जिल्ह्यातील शेतकरी नेहमीच उत्पन्नवाढीसाठी विविध प्रयोग करताना दिसत आहेत. असाच एक प्रयोग साक्री तालुक्यातील देवळीपाडा येथील आनंदा सूर्यवंशी या ५७ वर्षीय शेतकऱ्याने काळ्या भाताची लागवड करून केला आहे. विशेष म्हणजे तब्बल ७० पोती काळ्या भाताचा वाण त्यांनी आपल्या शेतात पिकविला आहे. या काळ्या भाताची सध्या परिसरात जोरदार चर्चा आहे.

काळ्या भाताच्या नियमित सेवनाने कर्करोग व हृदयरोग टाळता येऊ शकतो. शरीरातील चरबीचे प्रमाणदेखील कमी करता येऊ शकते. असा हा बहुपयोगी काळा भात पिकवण्याचे प्रमाण मात्र कमी आहे. या पिकाचे एकरी १३ ते १५ क्विंटल उत्पन्न येते, जे नियमित भात पिकापेक्षा कमी आहे. मात्र, या भाताला भाव नियमित मागणी असलेल्या भातापेक्षा चार ते पाचपट अधिक मिळतो. अशा या बहुपयोगी भाताचे उत्पन्न साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आदिवासी शेतकरी घेऊ लागला आहे. कृषी क्षेत्रातील हा नावीन्यपूर्ण बदल येत्या काही दिवसांत नक्कीच परिवर्तनाचा भाग बनेल, अशी अपेक्षा आहे.

■ पिंपरी, प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका काँग्रेस आत्मविश्वासाने लढणार आहे. काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा खा. सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या विविध समाज उपयोगी कार्यक्रमाद्वारे नागरिकांशी संवाद साधण्यात येत आहे. तसेच पायापासून बांध्यापर्यंत काँग्रेसची महिला संघटना बांधण्याचे काम सक्षमपणे सुरु आहे. त्याअंतर्गत पिंपरी चिंचवड शहर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी मुलाखती घेण्याच्या कार्यक्रमास मिळालेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद विशेष उल्लेखनिय आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्या सव्वालाखे यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने पिंपरी येथील सावित्रीबाई फुले सभागृहात पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षपदासाठी इच्छुक असणाऱ्या महिलांच्या मुलाखतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेस शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम, नवी मुंबई महिला काँग्रेसच्या अध्यक्षा उज्वला साबळे, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या सरचिटणीस संगिता तिवारी, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्षा शामला सोनवणे, माजी नगरसेविका निर्मला कदम तसेच प्रा. शैलजा सांगळे, भारती घाग आदी उपस्थित होते. यावेळी संध्या सव्वालाखे आणि संगिता तिवारी यांनी महिला शहराध्यक्षपदासाठी इच्छुक असणाऱ्या महिलांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये नंदताई तुळवे, छाया देसले, सायली नढे, अनिता अधिकारी, गुड्डिया मलशेट्टी, गुड्डिया पोळे, स्वाती शिंदे, शोभा फाले, कमला कोंडी, शितल कोतवाल, तुलसी नांगरे, शिवानी भाट, प्रतिभा कांबळे यांनी मुलाखती दिल्या. यामध्ये वकील, सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधी, राजकीय क्षेत्रात व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा समावेश होता.

■ चाकण, प्रतिनिधी

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांदा, बटाटा व पालेभाज्यांची मोठी आवक

झाली. लसणाची आवक स्थिर राहिली. शर्यत बंदी उठल्याने गुरांच्या बाजारात मोठी उलाढाल झाली. बैल, म्हैस, गाय व शेळ्या मेंढ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली. विशेषतः शर्यतीच्या खोंडांची मोठी खरेदी विक्री झाली. एकूण उलाढाल ३ कोटी, ५० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ५,५०० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ३,१०० क्विंटलने वाढली व कमाल भाव २,७०० रुपयांवर स्थिरावले. बटाट्याची एकूण आवक ३,००० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक १,१०० क्विंटलने वाढून भावात वाढ झाली. बटाट्याचा कमाल भाव १ हजार ४०० रुपयांवरून १,६०० रुपयांवर पोहोचला. जळगाव भुईमूग शेंगा व बंदूक शेंगांची काहीच आवक झाली नाही. लसणाची एकूण आवक २२ क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक स्थिर राहून लसणाच्या कमाल भावाही ६ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक १५७ क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ७६ क्विंटलने घटली. हिरव्या मिरचीला २,५०० ते ३,५०० रुपये भाव मिळाला.

हरवले आहे

मी, अशोक गोविंद टोके राहणार २/१ आंबेडकर नगर, मुं.नं. [illegible] सोसायटीचे दिलेले भागपत्र क्र. [illegible] एकूण भाग १० प्रत्येकी १०० रु. या प्रमाणे एकूण भाग [illegible] किंमत १०००/- हा हरवला आहे. कोणालाही सापडल्यास कृपया पत्त्यावर आणून द्यावे.

Mob.No.: 9920060778

BYP

जाहीर नोटीस

[illegible]

अखेर कातकरी समाजाला मिळाला शेंद्रे येथे घरकुलाच्या रूपाने ‘निवारा’

■ सातारा, प्रतिनिधी

पन्नास-साठ वर्षापूर्वी कोकणातून उपजीविकेचे साधन शोधत घाटावर आलेल्या कातकरी समाज्याला आज ही उपेक्षित जिणं जगावे लागत आहे. त्याला अपवाद शेंद्रे ता सातारा येथील समाज बांधव ठरले असून घरकुलाच्या रूपाने त्यांना कायमचा निवारा मिळाला आहे. भटकंती थांबली असून वीस कातकरी कुटुंबातील सदस्य गुण्या गोविंदाने येथे राहण्यास आले आहेत.

ग्रामीण भागात गावगाडा चालविणारा घटक म्हणून कातकरी समाज्याला गृहित धरून वाटचाल सुरू आहे. अनेक गावांमध्ये धार्मिक मंदिरे, मशिद, विहार व समाज मंडप उभी राहिली. राजकीय नेत्यांनी मतदान डोळ्यासमोर ठेवून अर्थसहाय्य केले पण, उपेक्षित समाज्याला निवारा मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुढाकार घेतला नाही. त्याला शेंद्रे गाव अपवाद ठरले आहे. ग्रामीण भागात एक म्हण प्रचलित आहे घर पहावे बांधून व विहीर पहावे खोदून हे करत असताना असंख्य अडचणी येत असतात तथापि सातारा तालुक्यातील मौजे शेंद्रे येथील वीस कातकरी कुटुंबाला स्वमालकीची जागा व पक्के घर मिळाले आहे. प्रत्येक घरकुल लाभार्थी यांना घरकुल मंजूर करणे साठी जातीचे दाखले व उत्पन्नाचे दाखले आवश्यक असलेने ते शासन स्तरावरून उपलब्ध करणे साठी तत्कालीन सातारा प्रांत अधिकारी सौ स्वाती देशमुख व तहसीलदार आशा होळकर, शेंद्रे सरपंच, उपसरपंच व सदस्य तसेच ग्रामविकास अधिकारी गोविंद माने, तलाठी आण्णा साहेब, मंडलाधिकारी व शेंद्रे येथील सामाजिक कार्यकर्ते अमर मोरे, विजय पोतेकर, प्रकाश काशिद, यांनी विशेष प्रयत्न केले. शासनाची प्रधानमंत्री आवास योजना -१ व शबरी आवास योजना -११ लाभार्थींना घरकुले मंजूर झाली.

प्रफुल्ल पटेलांनी लेकाच्या लग्नात सलमान खानसोबत धरला ठेका

■ जयपूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार प्रफुल्ल पटेल यांचा मुलगा प्रजय पटेलच्या लग्नानिमित्त जयपूरमध्ये विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला बड्या उद्योगपतींसह बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. भारताचे सर्वोत्कृष्ट उद्योगपती अनिल अंबानी, गौतम अदानी यांच्यासह इतर उद्योगपती आणि नेत्यांनी देखील हजेरी लावली होती. लग्नानिमित्त हा कार्यक्रम मोहड्डा जयपूरच्या रामबाग पॅलेसमध्ये आयोजित करण्यात आला होता.

मुलाच्या लग्नानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बॉलिवूड सेलिब्रेटी सलमान खान, शिल्पा शेट्टी आणि अनिल कपूर यांच्यासह पटेल यांनी ठेका धरला.

प्रजय पटेलचं लग्न मुंबईतील ज्वेलरी व्यावसायिक शिरीष पुंगलिया यांची मुलगी शिविका हिच्यासोबत झालं आहे. १८ डिसेंबरच्या सायंकाळ पर्यंत ३५ विमानांचं जयपूरमध्ये आगमन झालं होतं. प्रफुल्ल पटेल यांच्या मुलाच्या लग्नानिमित्त करण्यात आलेल्या कार्यक्रमात उद्योगपती अनिल अंबानी आणि त्यांची पत्नी टीना अंबानी, अदानी उद्योग समूहाचे गौतम अदानी, सज्जन जिंदल, भारती एअरटेलचे सुनील भारती, हिंदुजा समूहाचे श्रीचंद हिंदुजादेखील उपस्थित होते. तसेच महाराष्ट्रातील राजकीय नेते आणि क्रिकेटर सुद्धा या कार्यक्रमाला उपस्थित होते.

नोटीस

श्री अनंत के.पै राहणार ४/८ गुरुदेव सोसायटी, हाजिनकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई-२५ असून रिपल फर्टिलायझर्स कंपनीचे शेअर्स सर्टिफिकेट्स एकूण १५० शेअर्स

फोलिओ	सर्टिफिकेट शेअर्स	क्रमांक
४३८५१७	५०	२५००६१२६ ते २५००६१७५
८४८५१७	५०	४६८५६१२६ ते ४६८५६१७५
१४०७४४	५०	६४३१८१११ ते ६४३१८१३०

गहाळ झाले आहेत. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर किंवा ९८३३२४१५६६ संपर्क साधावा.

BYP

Before in the Court of S.V. Jadhav Court,
New Building 3rd Floor, Room No. 314, 315
Shivajinagar, Pune

SCC No.- 13610/2018

FORM No. 4

PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED

(See Section 82 of Cr. P.C)

WHEREAS complaint has been made before me that accused MR. PRASHANT BEKE (Prop. M/s. Omkar Consultancy) R/at- Room No.1, Jai Maharashtra Enterprises, 1st Floor, Ghamat Terrace Opp. Dadar Railway Station, Dadar (W), Mumbai- 400028 has committed (or is suspected to have committed) the offence of - punishable under section - of the 138 of Negotiable Instrument Act, and it has been shown to my satisfaction that the said accused Mr. Prashant Beke has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant).

Proclamation is hereby made that the said accused Mr. Prashant Beke is required to appear at before this Court to answer the said complaint on the 12/01/2022.

Dated this 17/11/2021

विद्यार्थ्याच्या तक्रारीनंतर मंत्र्याने केले शौचालय साफ

■ इंदौर

सर्वसामान्य माणसाच्या तक्रारीची दखल मंत्री घेत नाहीत असे म्हटले जाते. पण इंदोरमध्ये मात्र वेगळेच घडले आहे. एका विद्यार्थ्याच्या तक्रारीनंतर चक्क मंत्र्याने स्वतः पेऊन शौचालय साफ केले. संपूर्ण देशात कदाचित अशी घटना पहिल्यांदाच घडलेली असावी त्यामुळे केवळ इंदोरच नव्हे तर संपूर्ण मध्य प्रदेशात या घटनेची चर्चा सुरु आहे आणि याचे सोशल मीडियावर फोटो सुध्दा व्हायरल झाले आहेत.

मध्य प्रदेशचे ऊर्जामंत्री प्रद्युम्न सिंग तोमर हे इंदोर येथील एका सरकारी कन्या शाळेची पाहणी करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता शाळेतील स्वच्छतागृह अत्यंत अस्वच्छ असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली. त्यांची ही अडचण लक्षात घेऊन ऊर्जामंत्री थेट शौचालयात गेले आणि वेळ न घालवता त्यांनी स्वतःच्या हाताने स्वच्छतागृहाची सफाई करण्यास सुरुवात केली. हे सर्व बघून सर्वजण अवाक झाले.

सोशल मीडियावर फोटो व्हायरल

त्यानंतर तोमर यांनी सांगितले शाळेतील स्वच्छतागृह स्वच्छ नसल्याने आम्हाला खूप त्रास होतो. तिथी ही तक्रार ऐकून मला खूप वाईट वाटले आणि त्यानंतर मी ३० दिवस स्वच्छतेची शपथ घेतली. त्यानंतर कोणत्या न कोणत्या संस्थेत जाऊन मी स्वच्छता करतोय आणि स्वच्छतेचा हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचायला हवा. त्यामुळे प्रत्येकाने प्रेरणा घ्यायला हवी अशीही त्यांनी सांगितले.

एका मंत्र्याने स्वतः हातात झाडू घेऊन शौचालयाची स्वच्छता केल्याने लोकांनाही आश्चर्य वाटत आहे मात्र यातून मंत्र्यांविषयी लोकांच्या मनात जे गैरसमज आहेत ते दूर होण्यास मदत होणार आहे.

ठाणे महानगरपालिका, ठाणे

घनकचरा व्यवस्थापन विभाग

निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांची दैनंदिन साफसफाई करण्यासाठी ०१ नग Dust Sweeping Machine खरेदी करणे व सदर मशिनची ०३ वर्षे परिचालन, निगा व देखभाल करणेकामी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदरच्या कामाचे निविदा प्रपत्र www.mahatender.gov.in या वेबसाईटवर दि.१८/१२/२०२१ ते दि.१३/०१/२०२२ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असून सदर निविदेची निविदा पूर्व बैठक दि.०५/०१/२०२२ रोजी आहे. प्राप्त निविदा दि.१४/०१/२०२२ रोजी १६.०० वाजता किंवा निविदा उघडण्याची पूर्व सूचना देऊन निविदाकार अथवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील. प्राप्त झालेली कोणतीही निविदा पूर्णतः अथवा अंशतः स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.

ठामपा/पिआरओ/घन.व्यवस्थापन/१२१५/२१-२२ जाही/-

दि:१७.१२.२०२१ — उपआयुक्त(घकव्य)

pl.visit our official web-site — घनकचरा व्यवस्थापन विभाग

www.thanecity.gov.in — ठाणे महानगरपालिका,ठाणे

संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !

नाशिकच्या सेंट थॉमस चर्चमध्ये फादरने केला आत्महत्येचा प्रयत्न

नाशिक - वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून नाशिकमधील सेंट थॉमस चर्च मध्ये एका फादरने बिशपसमोर पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली आहे. आज रविवारच्या प्रार्थनेवेळी हा प्रकार घडला. या घटनेत फादर अनंत आपटे हे जखमी झाले आहेत. या घटनेत ते १८ टक्के भाजले आहेत. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, या घटनेमुळे भाविकांना जबर धक्का बसला आहे.

नाशिकमधील शालिमार या शहराच्या मध्यवस्ती असलेल्या भागात सेंट थॉमस चर्च आहे. या चर्चच्या समितीमध्ये अनेक विषयांवर मतभेद आहेत. त्यात समितीने फादर अनंत आपटे यांच्यावर फसवणुकीचा आरोप केला होता. त्यांनी याबाबत आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचे कोणीही ऐकून घेतले नाही. त्यामुळे फादर आपटे मानसिक तणावात होते. रविवारीसुद्धा त्यांनी शालिमार येथील सेंट थॉमस चर्चमध्ये उपासनेवेळी महाधर्मगुरू शरद गायकवाड यांच्यासमोर आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी त्यांचे काहीही ऐकून घेतले नाही. त्यामुळे या मानसिक ताणाला कंटाळून फादर आपटे यांनी चर्चमध्येच स्वतःवर पेट्रोल टाकून पेटवून घेतले.

नागपूरच्या गोरेवाडा प्रकल्पामध्ये चौकीदाराचा संशयास्पद मृत्यू

नागपूर - नागपुरातील गोरेवाडा प्रकल्पाच्या युनिट क्रमांक दोनच्या चौकी क्रमांक ४ येथे रात्रपाळीत चौकीदार म्हणून काम करणाऱ्या रवींद्र काळबांडे (४०) यांच्या संशयास्पद मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली. रविवारी सकाळी ८ वाजता त्याचा मृतदेह चौकीमध्येच आढळला असून ही चौकी धुराने काळवंडलेली होती. त्यामुळे त्याचा मृत्यू कोणत्या कारणाने निष्कर्ष निघालेला नाही. गोरेवाडा प्रकल्पाच्या स्थापनेपासून रवींद्र हे कंत्राटी चौकीदार म्हणून काम करत होता. रात्री काळबांडे हा युनिट क्रमांक दोनमधील चार नंबरच्या चौकीवर रात्रपाळीत कामावर होता. ही चौकी अगदी काटोल-काळमेश्वर रोडवरच असून रविवारी सकाळी त्याची शिफ्ट बदलल्यावर चार्ज घेणारा दुसरा चौकीदार गेला असता त्याचा मृतदेह आढळून आला. चौकीचे लोखंडी दार आतून बंद होते. ही चौकी आतून पूर्णतः धुराने काळवंडलेली होती. तसेच एका पिंपाच्या घमेल्यात शेकोटीसाठी पेटवलेली राख असल्याचे लक्षात आले. मृताच्या [illegible] त्याचे अंथरूण मात्र पूर्णतः [illegible]

SBI

भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

सूचना

[illegible]

भारतीय स्टेट बँक

[illegible]

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या [illegible]

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी निराकरण मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियम, २०१६ चा विनियम ६ अन्वये)

न्यू स्टील ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

[illegible]

जाहीर सूचना

[illegible]

जाहीर सूचना

[illegible]

Calls and notifications will vibrate